# सहन होणार नाही इतकं डिस्टॉर्शन झालेली कथा

## लेखक : असंबद्ध जिब्रिश

~~~

एखाद्या निष्प्राण देहाच्या रखरखीत कातडीगत भासणाऱ्या त्या उजाड माळावरून अथांगाच्या दिशेने त्याने टाकलेलं कितीतरी हजारावं पाऊल जेव्हा लडखडलं आणि तो तोल जाऊन खाली पडला,  धुळीशी एकरूप झाला तेव्हा सूर्य भगभगीत ज्वालांच्या सहस्र जिव्हांनी आभाळाच्या माथ्यावर तांडव करीत होता. त्याचे ओठ निष्पर्ण तरुसारखे सुकले होते, घशाला केव्हाची कोरड पडली होती आणि फक्त शरीरावरच नव्हे, तर प्राणांवरदेखील धूळ साचली होती. त्याला पुन्हा उठायचं होतं पण ती इच्छादेखील कमालीची जडशीळ झाल्यासारखी भासत होती. आधी त्या इच्छेची अजस्त्र शिळा मनाच्या खांद्यांवर घ्यायची आणि मग तिच्या सहाय्याने शरीर उचलायचं ही कसरत आता जमेल असं त्याला वाटेना. देहाच्या कुपीतून प्राणांचे अत्तर उडून जाण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपलीय अशी जाणीवदेखील त्याच्या थकलेल्या मेंदूत लकाकून गेली. हं! त्या कुपीतून सुटलेल्या प्राणाचा दरवळ देखील आपल्याप्रमाणेच या अथांग माळावर वाहून वाहून थकणार आणि दिगंतावर हरल्यागत विरून जाणार... कोणाच्याही नकळत. जन्माच्या व्यवहाराची किंमत जन्माच्या पल्याडदेखील शून्यच! डोळे कायमचे मिटण्यापूर्वी एकदा या विश्वाचा आपल्या कवेत येणारा 'भवताल' नावाचा यःकश्चित तुकडा सगळ्या इंद्रियांतून श्वासासारखा भरून घ्यावा या उद्देशाने त्याने महत्प्रयासाने मान किंचित उचलली आणि अर्धवट मिटलेले डोळे सताड उघडले. तो प्रखर उजेड त्याच्या डोळयांना हजारो सूक्ष्म सुयांसारखा टोचणारच होता की तेवढ्यात त्याच्या क्षीण दृष्टीवर सावली पसरली आणि अगदी पुढ्यातच- हाताच्या अंतरावर त्याला दिसली एक भव्य वास्तू! साधारण दहा पुरुषच उंच, पण त्याच्या नजरेतून पाहता आभाळाला थटणारी! चारी बाजूंना काळेकभिन्न खांब- दगडाचे नव्हते ते, कारण सूर्यप्रकाशात ते चांगले चकचकत होते. ईल माशाच्या अंगासारखे तकतकीत. त्या खांबांनी वास्तूच्या भिंती धरून ठेवल्या होत्या. त्या भिंतीदेखील दगड-मातीच्या नव्हत्या. स्फटिकासारख्या पारदर्शक! निरखून पाहिलं तर आतलं दिसेल अशा. त्याच्या पुढ्यात असणारा वास्तूचा भव्य दरवाजादेखील स्फटिकाचा होता. इतकावेळ ही वास्तू इथे नव्हती, आता कुठून आली या प्रश्नाने किंवा त्या अकस्मात आश्चर्याने त्याच्या शरीरात कुठूनशी एक चेतना जागली. तो भारावल्यासारखा तसाच खुरडत पुढे सरकला. दरवाजातून निरखून पाहू लागला. आत काही करड्यानिळसर रंगाच्या जिवंत आकृत्या त्याला दिसल्या. तो उत्तेजित झाला. सगळी
~~~

ताकद एकवटून तो उभा राहिला. तेवढ्यात आत बसलेली एक आकृती उठली, त्याच्याकडे रोखून बघत दरवाजापर्यंत आली आणि तिने तो भव्य दरवाजा अलगद उघडला. त्यासरशी आतून स्वर्गीय भासावा अशा थंडगार वाऱ्याचा झोत खास त्याच्यासाठीच यावा तसा बाहेर आला आणि दरवळ जसा शरीराभोवती घुटमळत राहतो, तसा तो आपलेपणाची ऊब असलेला थंडगार झोत त्याच्या रंध्रारंध्रात खेळला. तेवढ्या एका क्षणाच्या त्या दिव्य जाणिवेने तो असा सुखावला की त्याला वाटलं आपल्या जन्मभराचं सुख जरी गोळा करून इथे आणलं तरी याच्यापुढे खुजंच राहायचं! त्या व्यक्तीने त्याला हाताला धरून त्या वास्तूत आणलं. फक्त आत जाताना त्या वास्तूच्या कपाळावर काही अक्षरे कोरली होती ती वाचायची त्याच्याकडून राहून गेलं.

ती अक्षरे होती- सी सी डी.

त्या (वर वर्णन केलेल्या) माळरानावर- जशी पूर्वी एकलकोंडी काटेरी झाडं उगवायची तसं- एक सीसीडी उगवलं होतं. अथांगाच्या मधोमध ठेवावं तसं एकटंच तिथे पाय रोवून उभं होतं. आणि तो थंड वाऱ्याचा स्वर्गीय झोत एसीचा होता. त्या दूरदूरपर्यंत चिटपाखरूही नसणाऱ्या उजाड प्रदेशात तो एसी, ती माणसं, ती टेबलं आणि खाण्यापिण्याची सामुग्री आली कशी हा विश्वाच्या उत्पत्तीइतकाच गहन प्रश्न होता. पण त्या प्रश्नाने गोंधळून जाण्यापेक्षा त्या चमत्काराने भारावून जाणं त्याने पसंत केलं. काही क्षण आ वासून त्याने ते सीसीडी न्याहाळून पाहिलं. ते शहराच्या मधोमध असावं तसे लोक तिथे वावरत होते, कॉफी पीत होते. त्याच्याकडे मात्र कोणीच असं विशेष लक्ष देत नव्हतं. त्याला आत आणणारी व्यक्ती तर नाहीशीच झाली होती तिथून. (खरंतर ती प्रेशर आवरेना म्हणून धावतपळत टॉयलेटला गेली होती) एक मात्र होतं, की तिथे असणाऱ्या सगळयांचे पोशाख एकसारखेच होते. सप्तरंगी तलम पायघोळ झगे. उजेड पडला की त्यातून रंग झळाळून उठायचे. आणि गंमत म्हणजे तो पोशाख विशिष्ट पद्धतीने सळसळवला की त्यातून कर्णमधुर संगीत बाहेर पडायचं. तो अचंब्याने हे पाहत होता तेवढ्यात कुणीतरी मागून आलं आणि त्याच्याही अंगावर तो झगा चढवून निर्विकारपणे निघून गेलं. तो बावचळला. पण त्याला तो उबदार तलम पोशाख आवडला. त्याने तेवढ्यातल्या तेवढ्यात तो व्यवस्थित सळसळवून 'शांताबाई शांताबाई, रूपाची खान दिसती चान डी-डी-डीजे डीजे भुरट्या' हे त्या प्रसंगाला आणि वेळेला कमालीचं विसंगत भासणारं म्युझिकसुद्धा अत्यंत कुशलतेने वाजवलं. त्याचं हे

चालू असतानाच सीसीडीच्या एका गडद गहन गूढ गहिऱ्या कोपऱ्यातून धीरगंभीर असा आवाज--- च्यायला या पेसने लिहीत राहिलो तर कादंबरी होईल. आपलं टार्गेट लघुकथा आहे. कारण मिलेनियल्स आणि त्यांच्यापुढचे महाभाग- यांना एका गोष्टीवर इन्व्हेस्ट करायला इतका वेळ नसतो. त्यांना त्यातल्या त्यात लघुकथा सस्टेन होते. खरंतर लघुकथा म्हणणंसुद्धा रास्त ठरणार नाही, त्यांना प्लॉट सिनॉप्सीस सस्टेन होतो. असो. तर मॅटर असा आहे की हे जे सप्तरंगी झगेवले आहेत, ते एका कमालीच्या सिक्रेट सोसायटीचे मेम्बर आहेत. त्यांची सोसायटी इतकी सिक्रेट आहे की तुम्हाला-आम्हाला त्यांच्या अस्तित्वाची सुतराम कल्पना नाही. पण ते सगळ्या जगावर अंकुश ठेवणारे महापॉवरफुल लोक आहेत. म्हणजे कुठे सिव्हिल वॉर झाला पाहिजे, कुठली हुकूमशाही किती वर्षे टिकली पाहिजे, जगात कोणता नवीन व्हायरस आला पाहिजे, एखादं जग उलथंपालथं करून टाकणारं संशोधन समोर आलं पाहिजे की त्याला दाबलं पाहिजे इत्यादी निर्णय त्यांच्या हातात अस्तवत- सॉरी टायपिंग मिस्टेक झाली आणि इरेज करायचा कंटाळा आला- असतात*. त्यांची भेटण्याची जागासुद्धा किती सिक्रेट आहे हे वरच्या अफाट वर्णनातून तुम्हाला समजलं असेलच. ते असेच अतर्क्य निर्जन ठिकाणी कुठूनही आपलं सीसीडी पैदा करतात, कार्यभाग उरकतात आणि गायब होतात. गायब म्हणजे फक्त सीसीडी गायब होतं, ती माणसं काहीच न घडल्यासारखं तुमच्याआमच्यात मिसळून जातात. (सदर कथा अर्धवट राहिल्यास समजून जावे की ही लिहीली जाणारी कथा वाचणारा कोणीतरी त्यांच्यापैकी होता आणि त्याने लेखकास उचलले आहे.) तर आपल्या बंडूला त्या अथांग माळरानावरून या लोकांनी सीसीडीत घेतलं त्यामागे त्यांचा एक सुप्त हेतू होता. त्यांच्या टार्गेटवर असलेल्या एका देशात त्यांना मोठी अराजकता माजवायची होती आणि या बंडूकरवी ते ती माजवणार होते. त्यासाठी त्यांनी जी प्रोसेस डिझाइन केली होती ती फारच अफलातून आणि कोणाच्या पप्पाला लक्षात येणार नाही अशी होती. त्यांचा प्लॅन सांगण्याआधी त्यांनी याच बंडूला का निवडलं ते सांगायला पाहिजे. सदर बंडू हा अत्यंत निष्क्रिय आणि आत्मकेंद्री प्राणी होता. एककल्ली विचार करणारा, डोळ्यावर झापडं ओढून समूहाचा म्होरक्या म्हणेल ते ऐकणारा, नाही पटलं, अन्याय झाला तरी लग्नाची बायको असल्यासारखा दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या करणारा, रबराची तत्वबैठक असणारा पढतमूर्ख. त्यामुळे त्या देशात अराजकता माजवायला अतिशय योग्य असं ते रसायन होतं. या सप्तरंगी झगावाल्या सिक्रेट लोकांना ब्लॅक मॅजिकच्या पुढचं- सप्तरंगी मॅजिक यायचं. त्यांच्याकडे कुठल्यातरी जगावेगळ्या भाषेत लिहिलेलं एकाक्षरी सूत्र होतं, ते एखाद्याच्या कपाळावर कोरलं की अलगद त्याची कवटी उघडली जायची, कवटीतून एक प्रकाशाची स्क्रीन वर यायची आणि कॉम्प्युटरमध्ये कशा फाईल्स दिसतात तसे सबकॉन्शसमधले सगळे फोल्डर्स दिसून यायचे. मग त्यांना त्यात हवे तसे बदल करता यायचे.

एखाद्याच्या डोक्यात काहीतरी विध्वंसक आयडिया सोडणं असेल, किंवा एखाद्याकडून त्याची बुद्धिमत्ता काढून घेणं असेल. परवाच त्यांनी मर्सिडीजच्या सगळयात उच्चपदावर असणाऱ्या माणसाला सीसीडीत घेतलं आणि त्याच्या डोक्यात असिमेट्रिकल गाड्यांचा ट्रेंड आणण्याचं वेड पेरलं. म्हणजे एक हेडलाईट गोल आणि दुसरी चौकोनी किंवा भलत्याच आकाराची. त्याचं पुढे काय होईल ते कळेल आपल्याला भविष्यात. तर या केसमध्ये त्यांचा प्लॅन असा होता की सदर बंडूची कवटी उघडून त्याची वर वर्णन केलेली जी वृत्ती आहे तिला एनहान्स करून त्याच्या सबकॉन्शसची वायर श्वासनलिकेशी कनेक्ट करायची, म्हणजे बंडूला त्या देशात सोडल्यावर तो जिथे जिथे श्वास घेईल तिथे तिथे ती वृत्ती हवेत मिसळणार आणि इतरांच्या नाकातून जात जात दहाएक वर्षात देशभर होणार आणि हळूहळू त्यांचा कार्यभाग साधला जाणार. जास्तीची एक सेटिंग करण्याचाही त्यांनी विचार केला होता की त्या देशातल्या सगळयांना पॅरासाईट बनवायचं. त्यांची अस्मिता पोटभर जेऊ शकेल असे अत्यंत निरर्थक आणि कधीही सुटणार नाहीत असे प्रश्न ज्यातत्यात घुसडून ठेवायचे म्हणजे उगाच महत्वाच्या प्रश्नांचा उहापोह करणारी अतिशहाणी टोळकी नेस्तनाबूत होतील. प्लॅन डेंजर होता. देश धोक्यात होता. पण लोच्या झाला. झालं असं की सिक्रेट सोसायटीच्या सगळया मेम्बरपैकी फक्त त्यांची जी प्रमुख वृद्ध आणि जाडी बाई होती तिलाच ते एकाक्षरी सूत्र माहीत होतं. तिने बंडूला मूर्च्छित करून टेबलवर झोपवलं वगैरे आणि स्वतःचा एक अणकुचीदार दात तोडून ती त्याच्या कपाळावर ते सूत्र कोरायला जाणार, सगळेजण ते स्तब्ध होऊन बघणार इतक्यात सीसीडीच्या टॉयलेटकडून अत्यंत म्हणजे नादखुळा दुर्गंध वाहत वाहत आला, वृद्ध आणि जाड्या बाईच्या (आणि बाकीच्यांच्यापण) नाकात घुसला आणि त्या धीरगंभीर माहोलचा, त्या कृतीच्या पावित्र्याचा पार बट्ट्याबोळ झाला. ती मघाशी बंडूला आत आणणारी आकृती धावतपळत टॉयलेटला गेली होती तिचा पराक्रम हा. वृद्ध आणि जाडी बाई त्या आकृतीवर इतकी भडकली की तिने तिचा अणकुचीदार दात खाडकन जमिनीवर आपटला, मागोमाग एकेककरून सगळे दात उपटून काढले आणि बंदुकीच्या गोळीसारखे टॉयलेटला फेकून मारले, ते सुसाट वेगाने दरवाजा भेदून आत गेले आणि आकृतीच्या डोक्यात घुसले. आकृती गतप्राण. मग प्रचंड गदारोळ. सगळेचजण एकमेकांना अणकुचीदार दात फेकून मारू लागले, मारता मारता शांताबाई शांताबाई डी-डी-डीजे भुरट्या असं किंचाळू लागले. या कल्लोळाने आपला बंडू एकदम ताळयावर आला आणि जागा झाला आणि तडक उठून उभा राहिला तर त्याला लक्षात आलं की तिच्यायला आपण एका धुमशान रंगलेल्या हळदीच्या कार्यक्रमात आहोत आणि पिऊन तर्राट आहोत. आकाश गडद निळं आहे, त्यात चंद्र उपास्थित आहे आणि पलीकडच्या घरात टीव्ही लावलेला आहे. त्यावर एका पेटलेल्या आंदोलनाचं लाईव्ह दृश्य दाखवलं जात आहे. तिथल्या आंदोलकांची-पोलिसांची

आक्रमकता प्लस जोर आणि हिरवी-केशरी झुलपे उडवीत हळदीत नाचणाऱ्या युवकांची आक्रमकता प्लस जोर हे जवळजवळ सारखे आहेत. तो घाबरला. मघाचं सगळं खरं होतं की स्वप्न होतं? की खरं होतं? की खरंच होतं? तसं असेल तर श्वास घ्यायला नको! त्याने गपकन श्वास रोखून धरला. घेईचना तो. छातीत दगड ठेवल्यासारखं झालं, पिळवटून आल्यासारखं झालं, पण तरी नेटाने तो श्वास रोखून पडून राहिला आणि तळमळत बेशुद्ध झाला.

अचानक ठसका लागून तो पुन्हा एकदा ताळ्यावर आला तेव्हा तो एका सुरक्षित शहराच्या स्वच्छ आणि सुंदर परिसरात असलेल्या एका सीसीडीत टापटीप कपडे घालून कॉफी पीत फोनवर 9gag चे मेमे वाचत बसला होता. सकाळचं प्रसन्न ऊन पडलं होतं, सीसीडीत मंद संगीत वाजत होतं आणि रस्त्यावरून दोन्ही हेडलाईट्स सारख्या असणारी मर्सिडीज जात होती. त्याला आधीच्या कोणत्याही अवस्थेपेक्षा ही अवस्था लाजवाब वाटली आणि त्याने ठरवलं की आता यातून बिलकुल जागं व्हायचं नाही...

मग तो मेमे वाचून हसला.

मग त्याने कॉफीचा घोट घेतला.

तो तासन्तास 9gag स्क्रोल करत राहिला. तो तासन्तास कॉफीचे घोट घेत राहिला आणि तिकडे आभाळातून सरकताना कंटाळा आला म्हणून सूर्य त्याच्या भगभगीत ज्वाळांच्या तोंडातून ट्रँगट्रँगटुंगटुंगभ्रंमभुमडबडबडबलबबलब असे आवाज काढत राहिला.